# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी - 2262 0601, 2269 0602, 2264 1150/51, 30333447फॅक्स - 2269 2102.

E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


<u>जाहीर सूचना</u> क्रमांक: २अ/एडीएम/अनधिकृतसंस्था/२०१६/१५१४

मान्यता नसलेल्या विद्यापीठ /अनधिकृत संस्थाबाबत दिनांक : १७.११.२०१६

मान्यता नसलेल्या विद्यापीठ/अनधिकृत संस्थांमधील पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी , पदव्युत्तर पदविका ( Diploma, UG Degree, PG Degree,PG Diploma )व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश न घेणेबाबत.

प्रवेश नियंत्रण व शिक्षण शुल्क नियमन प्राधिकरण यांचे मार्फत महाराष्ट्र राज्यातील अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदविका व पदवी तसेच एमबीए/एमएमएस, एमसीए, एम.फार्मसी व एम.ई./एम.टेक. एम.आर्च.,एम.एचएमसीटी या पदव्युत्तर पदवी इत्यादी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहेत. या अभ्यासक्रमांना, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया / कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर/ विदयापीठ अनुदान आयोग / विद्यापीठे इत्यादी सक्षम प्राधिकरणांची व महाराष्ट्र शासनाची मान्यता असणे आवश्यक आहे. संचालनालयाच्या www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर वरील सक्षम प्राधिकरणांची मान्यता असलेल्या संस्था व सदर संस्थेत चालविले जाणारे अधिकृत अभ्यासक्रमांची यादी/ माहिती उपलब्ध आहे.

येथे असे नमूद करण्यात येते की, **सन २०१३चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० अन्वये महाराष्ट्र राज्यात उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण या मधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठयक्रम सुरु करण्यास मनाई करण्यात आली आहे.** व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेशोच्छुक विद्यार्थी वर्ग व पालक यांना सूचित करण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया/ कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर/ विदयापीठ अनुदान आयोग इत्यादी सक्षम प्राधिकरणांची व महाराष्ट्र शासन यांचेकडून मान्यता नसल्यास अशा विद्यापीठ /संस्थांमध्ये प्रवेश घेऊ नये.

सक्षम प्राधिकरणांची मान्यता नसलेल्या विद्यापीठ अथवा अनधिकृत संस्था प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांना खोटी आमिषे दाखवून अथवा संस्था मान्यताप्राप्त आहे असे भासवून प्रवेश घेण्यास प्रवृत्त करतात व नंतर विद्यार्थ्यांना त्यांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास येते. अशा प्रकारच्या तक्रारी या संचालनालयाकडेही येत असतात. या पार्श्वभूमीवर सर्व <u>प्रवेशोच्छुक विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांना सतर्क करण्यात येते की, कोणत्याही अनधिकृत संस्थेच्या अथवा विद्यापीठाच्या भूलथापांना बळी न पडता अभ्यासक्रमाची संलग्नता तपासून घ्यावी तसेच वर नमूद केल्याप्रमाणे संचालनालयाच्या संकेतस्थळावर अथवा सक्षम प्राधिकरणांच्या संकेतस्थळावर संबंधित संस्थेचे नाव व अभ्यासक्रम असल्याची खात्री करावी व नंतरच प्रवेश घ्यावा.</u> उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी महाराष्ट्रातील संस्था/ विद्यापीठाच्या मान्यतेबाबत या संचालनालयाशी अथवा संचालनालयाच्या विभागीय कार्यालयांशी संपर्क साधल्यास त्याबाबतची अधिक माहिती देण्यात येईल.

सही/-

(डॉ. सुभाष महाजन)

संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई.